MHJN040018742023

# <u>नियमित दिवाणी मुकदमा क्रं.२५०/२०२३ मधील नि.क्र.११ वरील आदेश</u>

बाबासाहेब व ई. वि. विष्णू व इतर

अर्जदारातर्फे प्रस्तुत अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे आयुक्त नेमणुकीकरीता दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला. सदर वादीचे कथन असे की, सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी विरुद्ध अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळणेबाबत दाखल केला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे मौजे टाका, ता. अंबड, जि. जालना येथील जमीन गटक्रमांक ९०, क्षेत्र ०२ हेक्टर, ३१ आर. पोटखराब ०० हेक्टर ०१ आर, आकार ०७ रूपये ५५ पैकी ०१ हेक्टर ७२ आर ज्याच्या चतू:सिमा खालीलप्रमाणे:

**पूर्वेस** : तुळसाबाई टेकाळे व विष्णू टेकाळे यांची जमीन,

**पश्चिमेस** : रस्ता व सरकारी शिव,

**दक्षिणेस** : अशोक बाबूराव केकान यांची जमीन,

**उत्तरेस** : विष्णू किसन यांची जमीन.

त्यातील वादी क्र.१ ची ०० हेक्टर ५६ आर, वादी क्र.२ ची ०० हेक्टर ५६ आर व वादी क्र.३ ची ०० हेक्टर ६० आर क्षेत्राची जमीन.

(सदर जमीनीस यापूढे "वादमिळकत" असे संबोधण्यात येईल)

३. वादग्रस्त जमीनी वादींच्या मालकी व ताब्यात असून वादी क्र.३ च्या लगत उत्तरेस वादग्रस्त जमीनीच्या गटामध्ये प्रतिवादी क्र.१ यांची जमीन आहे व इतर प्रतिवांदीची जमीन दक्षिणेस व उत्तरेस लागून आहे. परंतु, वादींच्या क्षेत्रावर मागील दोन ते अडीच वर्षात अतिक्रमण होवून जवळपास वादींच्या १८ गूंठे क्षेत्रावर अतिक्रमण झालेले आहे व प्रतिवादींनी त्यांच्या हद्दीखूणा देखील नष्ट केल्या आहेत. सबब, सदर जमीनीची मोजणी करून हद्दीखूणा कायम करण्यासाठी आयुक्तांची नेमणूक करणे गरजेचे आहे. वादी यांचे पुढे कथन की, सदरील जमिनीची मोजणी झाल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद संपुष्टात येईल. त्यामुळे वादींनी प्रस्तुत अर्ज मंजुर होण्याची विनंती केली.

४. प्रतिवादींविरूध्द दावा एकतर्फी चालविण्याचे आदेश झालेले असून या अर्जावर देखील प्रतिवादींना म्हणणे दाखल करण्यास संधी देण्यात आली. परंतु, योग्य संधी मिळून देखील प्रतिवादींनी म्हणणे दाखल केलेले नाहीत. सबब, अर्ज एकतर्फी व विना म्हणणे ऐकण्यात आला.

५. वादीतर्फे यूक्तीवाद ऐकण्यात आला. सदर प्रकरण प्रतिवादींतर्फे कोणतेही म्हणणे दाखल नसल्याने वादीची कथने कुठेही नाकारली गेली नाहीत. तसेच, वादग्रस्त जमीनीची मोजणी झाल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद संपुष्टात येणार आहे. त्यामुळे एकंदर परिस्थितीचा विचार करता अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख, अंबड यांची याकामी न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे टाका, ता. अंबड, जि. जालना येथील जमीन गटक्रमांक ९०, क्षेत्र ०२ हेक्टर, ३१ आर. पोटखराब ०० हेक्टर ०१ आर, आकार ०७ रूपये ५५ पैकी ०१ हेक्टर ७२ आर ज्याच्या चतू:सिमा खालीलप्रमाणे:

**पूर्वेस** : तुळसाबाई टेकाळे व विष्णू टेकाळे यांची जमीन,

**पश्चिमेस** : रस्ता व सरकारी शिव,

**दक्षिणेस** : अशोक बाबूराव केकान यांची जमीन,

**उत्तरेस** : विष्णू किसन यांची जमीन.

त्यातील वादी क्र.१ ची ०० हेक्टर ५६ आर, वादी क्र.२ ची ०० हेक्टर ५६ आर व वादी क्र.३ ची ०० हेक्टर ६० आर क्षेत्राची जमीन.

या जमिनीची मोजणी करुन खुणा कायम करण्यात याव्यात.

४. न्यायालयीन आयुक्त यांनी मोजणीचे व हद्दीखुणा दाखविण्याचे काम करणेपूर्वी उभय पक्षकार यांना आगाऊ नोटीस देवून दिनांक, वेळ कळवून कमिशन कामावेळी हजर राहण्याच्या सुचना देण्यात याव्यात.

५. कमिशन काम पुर्ण झाल्यावर नकाशा व अहवाल सर्व कागदपत्रांसह या न्यायालयात सादर करावा.

६. सदरचे कमिशनचे कामकाज आदेश प्राप्त होताच दोन महिन्यात पुर्ण करावे.

७. वादी यांनी कमिशनचे कामकाजाकरीता होणारी फी परस्पर संबंधित कार्यालयाकडे भरावी.

८. वादी यांनी कमिशन कामकाजाकरीता संबंधीत सर्व कागदपत्रांची यांची सहीशिक्क्याची नक्कल कमिशन पत्र काढणेकरीता सादर करावे.

९. येणेप्रमाणे कमिशन पत्र काढावे.

SIMA SACHIN JAIN

Digitally signed by SIMA SACHIN JAIN
Date: 2024.07.31 14:54:18 +0530

दि.३१/०७/२०२४.
अंबड.

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, अंबड.